जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
☏ : (०२०) २४२१५५८३
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

• संस्थापक •
स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.
संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.

❖ वर्ष ४८ वे ❖ अंक ११ वा ❖ जुलै २०१७ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३

**या अंकात** पान नं.


- ।। जिनेश्वरी ।। अध्याय १४ : इषुकारीया — १५
- उग्रतप की शोभा : शान्ति — २०
- असा आहे, ग्राहकहित दक्ष "रेरा" — २३
- श्री. ओमप्रकाशजी रांका - सोन्याच्या मॉलचे सोन्यासारखे व्यक्तिमत्व — २८
- कडवे प्रवचन — ३२
- कव्हर तपशील — ३३
- ऐसी हुई जब गुरुकृपा - ऊँचो मत बोल — ३९
- शक्ति पाने के १२ नियम — ४१
- सुखी जीवन की चाबियाँ - उचित वेशभूषा — ४३
- सन २०१७ का चातुर्मास — ४७
- कमजोर नहीं है आप इतने जो आडम्बर नहीं छोडेंगे — ४८
- आदमी दिखावा है.... (२) — ५१
- श्रध्दा की परख — ७१
- सकारात्मक विचार कसे करावे — ७२
- KG to PG शुल्क निश्चिती हवी — ७३
- जबकि — ८०
- श्रमण संघीय - चातुर्मास यादी — ८१
- आचार्य श्री कैलाससागर सुरि ज्ञानमंदिर — ८७
- चमत्कारिक बीज मंत्रों का प्रभाव — ८८
- श्री प्रीतिसुधाजी म.सा. अमृत महोत्सव, पुणे — ९१
- राष्ट्रसंत श्री पुलकसागरजी म.सा. — ९१
- पूना मर्चन्ट चेंबर — ९२
- जय आनंद ग्रुप, पुणे — ९२
- राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग सदस्य श्री. सुनील सिंघी — ९३

- क्लासिक पब्लिसिटी – अहमदनगर ९९
- महावीर इंटरनॅशनल ९९
- वीतराग सेवा संघ, पुणे १०५
- चि. वर्शिल शहा, अहमदाबाद – दीक्षा १०७
- सामाजिक परिवर्तन, जळगाव १०९
- हास्य जागृति १११
- स्वाध्याय अपनाये जीवन ज्योती जगाये ११२
- गांधी हॉस्पिटल, औरंगाबाद ११५
- सेन्सेस स्पालोन, पुणे ११५
- आचार्य शिवमुनिजी म.सा. चातुर्मास ११९
- दान १२०
- धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा १२०
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर B एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |

या अंकाची किंमत ५० रुपये.

B www.jainjagruti.in

B www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

**सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !**

## जैन जागृति - वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA
Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146
IFS Code : SBIN0006117

**जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा**

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**
**Email : jainjagruti1969@gmail.com** B **Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

- **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११९४०९
- **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
- **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
- **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
- **मार्केटयार्ड, पुणे –** श्री. प्रमोदकुमार शांतीलालजी छाजेड, मो. : ९८८१८७३७१०
- **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
- **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
- **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
- **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
- **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
- **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२११३००५५९
- **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
- **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
- **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
- **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
- **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
- **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
- **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
- **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
- **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
- **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
- **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
- **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
- **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
- **लासलगाव –** श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ७७७४९३८०३२
- **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
- **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
- **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
- **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
- **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
- **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
- **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
- **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२५४२२५३
- **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

**तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत**

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमशः)*

## अध्याय १४ - इषुकारीय

मागील अध्यायात दोन गवळीपुत्रांची कथा पूर्ण झाली. उरलेल्या दोन गवळीपुत्रांची जीवनयात्रा या अध्यायात आहे. नात्यांची गोड कडू कथा मागील अध्यायात आपण पाहिली. मिळता-मिळता, जुळता-जुळता कशी नाती दुरावली जातात, फक्त नियाणा केल्यामुळे.....

या अध्यायात पाहू नाती कशी सांभाळली जातात. तिसऱ्या जन्मात या दोन गवळीपुत्रांची चार व्यापाऱ्यांबरोबर मैत्री होते. हे सहाजण बरोबरच साधना करुन देवलोकात जातात. देवलोकातून ४ मित्र पृथ्वीतलावर आधी जन्मतात त्यातील दोन होतात इषुकार नगरीचा राजा इषुकार व त्याची पत्नी राणी कमलावती व दोन होतात राजाचाच पुरोहित भृगू व त्याची पत्नी भद्रा. शेवटचे दोन मित्र देवलोकातच असतात ते विचार करतात की भृगू पुरोहिताच्या मुलांच्या रुपात जन्म घेण्याआधी आपण अगोदरच जाऊन भृगू पुरोहित दाम्पत्याला उद्बोधन देऊ म्हणजे आपल्या संयम-जीवनाच्या मार्गात अडसर येणार नाही. देव-ब्राह्मणाच्या रुपात ते दोघे भृगूपुरोहिताच्या अंगणात पोहोचतात, उपदेश देतात, प्रतिबोध देतात, पुरोहित भारावून जातो. संतती-प्राप्ती होत नसल्याचे दुःख तो ब्राह्मणांच्या समोर मांडतो व प्रश्न विचारतो, ''आम्हांला मुलगा होईल का ? ब्राह्मण म्हणतात, ''होय तुम्हाला दोन मुले होतील. पण ती दोघे दीक्षा घेतील. तुम्ही त्यांना दीक्षा घेण्यासाठी अडवू नका.'' वरदान देऊन ब्राह्मण निघून जातात.

**संपर्क-संबंध-अनुबंध**

काही दिवसांनी भद्रा गर्भवती होते. पण तिला चिंता वाटू लागते ब्राह्मणाचे वरदान खरे ठरले, पण त्यांनी खरच दीक्षा घेतली तर... आपल्या पासून ती दुरावतील. यथासमय भद्राला दोन मुले होतात, पण दांपत्याच्या मनात त्यांच्या दीक्षेची भीती कायम असते. ते इषूकार नगर सोडून पर्वतांनी वेढलेल्या निर्जन वनात घर बांधून राहू लागतात. मुलं मोठी होत असतात. संन्यासी, योग्याशी संपर्कच येणार नाही, संपर्क नाही तर संबंध नाही व संबंध नाही तर अनुबंध होण्याची संभावनाच नाही. संपर्क-संबंध-अनुबंध हा क्रमच आहे. संपर्क तुटला की संबंध संपतो, संबंध संपले की अनुबंध ही सरते, हीच परंपरा कायम आहे.

परमात्म्याशी संपर्क ठेवला की त्या परमात्म्याशी संबंध प्रस्थापित होतो आणि संबंध प्रस्थापित झाला की अनुबंध घट्ट होत जातात.

**भृगु पुत्रांना संयमापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न**

पुरोहिताच्या मनात धास्ती असतेच की, कुमारावस्थेत खरंच तर ही मुले दीक्षा तर नाही ना घेणार ? तो मुलांच्या मनात संन्यासी, योगी, मुनींबद्दल भीती निर्माण करतो जैन मुनींचा वेश परिचय देऊन मुलांना त्यांच्यापासून सावध रहायला सांगतो. जैन मुनी क्रूर असतात, अशी भावना मुलांच्या मनात प्रबळ करतो.

बंधूंनो, आपणही असेच करता ना ! एखादे मूल रडत असले आणि आम्ही समोरुन जाताना दिसला की सांगता ना, तू रडणे थांबव नाही तर ते तुला पकडून नेतील. ते मूल रडायचे थांबते पण आमची भीती त्यांच्या

मनात बसते. कसं असतं ना ! मुलगा गुंड झाला तरी चालेल, गुटखा-बहाद्दर झाला तरी चालेल, कुकर्मी झाला तरी चालेल पण त्याने संयम घेऊ नये, दीक्षा घेऊ नये यासाठी आपण सतर्क असतो. हातात बंदूक घेतली तरी चालेल पण त्याने रजोहरण घेऊ नये. मुलांना कुठल्या गोष्टीत प्रवृत्त करावे व कुठल्या गोष्टीत परावृत्त करावे, याचा विवेक पालकांना आला, तर मुलांच्या जीवनाचे मंगल व्हायला वेळ लागत नाही.

पुरोहिताने मुलांचा संयम-जीवनाशी संपर्क येणार नाही, याची पूर्ण दक्षता घेतलेली होती. एकदा मुले जंगलात खेळत होती. त्यांना समोरुन मुनी येताना दिसले. मुले घाबरली. पित्याचे बोल आठवले, मुनी मुलांना मारतात... मुले झाडावर चढून बसली. योगायोगाने ते मुनीसुद्धा त्याच झाडाखाली येऊन बसले. मुले आणखीनच घाबरली. आता हे मुनी आपल्याला पकडून घेऊन जातील, हा विचार बळावला व ती श्वास रोखून पाहू लागली त्या मुनींकडे. मुनींनी भिक्षा आणलेली झोळी उघडली, पात्रे उघडली व मिळालेला प्रसाद प्रभुभक्ती करुन ग्रहण करायला सुरुवात केली. मुलांनी वरुन पाहिले, ! अरे यात तर प्रसाद आहे, यांच्या झोळीत शस्त्रे नाहीत ? पात्र पाहता पाहता पात्रता उंची वाढू लागली त्यांच्या चेतनेची... विचारचक्र सुरु झाले. आपण यापूर्वी कधीतरी असे पात्र पाहिले आहे ? कधी... कधी... ? कोठे पाहिले...? विचार भोवऱ्यासारखे आत आत खोलवर जाऊ लागले व तेथपर्यंत जेथे पात्र यापूर्वी त्यांनी पाहिले होते. गतजन्मीचे स्मरण झाले.

घरी आल्यावर मुले वडिलांनी म्हणाली, ''अहो तात, ज्या गोष्टीपासून आपण आम्हाला वाचविण्याचा प्रयत्न केला ते आता वाचू शकणार नाही. ज्या शाश्वत सत्यापासून आपण आम्हाला वंचित करु पहात होता ते तर आमचे पूर्वसंचित आहे. आमचा मार्ग प्रशस्त व स्पष्ट झाला आहे. आता आमची इच्छा आहे त्या मार्गावर मार्गस्थ होण्याची. आम्हाला संन्यास घेण्यासाठी आज्ञा द्या.''

**स्व चरित्रामुळेच स्वर्ग किंवा नरक**

तेव्हा पुरोहित त्यांना आपल्या मोहसन्न बुद्धीने समजावतो, ''बाळांनो, आत्ताच कुठे संन्यास घेता येतो का ? वेद सांगतात की अपुत्रस्य गतिर्नास्ती - ज्याला पुत्ररत्न नाही त्याला परलोकात गती मिळत नाही.'' बंधूंनो, ज्याला मुलगा नाही त्याला परलोक नाही, या एका असत्य धारणेमुळेच आपल्या देशात कन्या-भ्रूण हत्येचे प्रमाण जास्त आहे. मुलगा नाही तर पाणी कोण देईल ? अग्नी कोण पेटवेल ? पण जिनशासन या गोष्टीचा स्वीकार करीत नाही. कोणीही मुलगा तुम्हाला स्वर्ग किंवा नरक देत नाही. तुम्हाला परलोक मिळेल, स्वर्ग मिळेल तो तुमच्या चारित्र्यामुळे, तुमचा परलोक बिघडेल, तुम्हाला नरक मिळेल तो ही तुमच्या चारित्र्यातील बिघाडामुळेच.

मुलांनी वडिलांना हेच उत्तर दिले. ''कोणताही मुलगा तुम्हाला स्वर्ग देऊ शकणार नाही. कोणताही मुलगा तुम्हाला नरकापासून वाचवू शकणार नाही.'' मुलाचं सटीक उत्तर ऐकून त्यांना वैषयिक सुखाकडे आकर्षित करण्याहेतू पुरोहित म्हणतो, ''बाळांनो वेदाध्ययन करुन ब्राह्मणभोजन घाला, लग्न करा, मुल-बाळं होऊ द्या गृहस्थाश्रमाचे सुख उपभोगा व मग आरामात संन्यास घ्या.''

पित्याच्या प्रलोभनाना न भुरळता कुमार म्हणतात ''तात, वेदांचे अध्ययन विना चरित्राचे तारणहार होऊ शकत नाही. जन्मजात पुत्र असो वा सहचारिणी असो, पुढच्या जन्मीसाठी काठी बनू शकत नाही. मेल्यानंतर अस्थी गंगेत विसर्जन करा, विहिरीत टाका किंवा मातीत पुरा तुमचा नरक टळत नाही.''

**पाप-पुण्याची धर्मांधता**

अरे समजदार माणसा ! अशा नदीत अस्थी वाहून स्वर्ग मिळाला असता तर नरकात कोणी गेलं असत का ? किती खोट्या मिथ्या धारणांना चिकटून आहात

तुम्ही ! माणूस मेल्यानंतर त्याच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी तुम्ही पिंडदान करता, ब्राह्मणांना जेवू घालता, परंतु भगवती सूत्रात भगवान महावीरांनी स्पष्ट सिध्दांत दिलेला आहे, मृत व्यक्तीच्या निमित्ताने जेवढे आरंभ-समारंभ होतात, जीवादी हिंसा होते, त्या सगळ्या पापांची, दोषाची स्पंदने परलोकात गेलेल्या त्या जीवाकडे पोहोचतात. मृतात्म्याच्या शांतीसाठी तुम्ही कितीही ब्राह्मणांना जेवू घाला, परलोकात गेलेल्या जीवाला शांती थोडीच मिळणार आहे, हे सारे भोंदू लोकांचे पोट भरायचे भोंदूगिरीचे धंदे आहेत. जैन धर्म असली भोंदूगिरी मान्य करीत नाही त्याच्या मागचा गहन सिद्धांत, विज्ञान सुद्धा भगवंतानी सांगितला आहे.

जो आत्मा इथून एकदा आयुष्य पूर्ण करुन गेला की तो त्याच्या कर्मानुसार जिथे जन्म घ्यायचा तिथे घेते. आपली अशी सहज धारणा असते की परलोकात गेलेल्या त्या जीवाकडे पापाची स्पंदने पोहोचू शकतात, तर पुण्याची स्पंदनेही पोहोचायलाच हवीत. याचे विश्लेषण देताना परमात्मा सांगतात की आपल्याकडे दोन दरवाजे असतात एक पापाचा, एक पुण्याचा. पापाचे द्वार कायम उघडेच असते, परंतु पुण्याचे द्वार मात्र कधी-कधीच उघडतात बहुतांशी बंदच असतात या द्वाराला उघडण्याचे, खुले ठेवण्याचे सामर्थ्य, पराक्रम, पद्धती, आपल्याकडे नसते आणि म्हणून पापाची स्पंदने सहज प्रवेश करतात. परंतु पुण्याची स्पंदने पोहोचू शकत नाहीत. हेच पुरोहित पुत्र पित्याला समजावून सांगत आहेत, कोणताही पुत्र पित्याला नरकापासून वाचविण्यास समर्थ नाही. एखादा पुत्र नरकयातना भोगावयास मात्र निमित्त बनू शकतो. पुरोहित पिता हतबल होऊन वेगवेगळ्या पद्धतीने मुलाचं मन वळवू पहात आहे, ''अरे बाळांनो ! कोणत्या आत्म्याच्या चक्रात अडकलात ? या शरीराबरोबरच आत्मा समाप्त होऊन जातो.''

यावर कुमार निग्रहाने उत्तर देतात, ''तात धनसंपत्तीमुळे वा परिजनांमुळे धर्मात काहीही फरक पडत नाही. आत्मा अमुर्त आहे. इंद्रियांच्या द्वारे त्याला जाणता येऊ शकत नाही.''

सत्याच्या या सुंदर ज्ञान शिवरुप चर्चेला विराम देत भृगुपुत्र म्हणतात, ''तात एवढे दिवस भोगासक्त होऊन, बेभान होऊन अज्ञानात जीवन जगत आलो, परंतु आता आम्हाला सत्याचे दर्शन, धर्माचे ज्ञान झाले आहे. आता आम्ही पापकर्म करु इच्छित नाही आपण आम्हांला संन्यास घेण्याची आज्ञा द्यावी.'' पुत्रांना संन्यास घेण्याची अनुज्ञा तर मिळालीच पण पुरोहिताला सत्याचे दर्शन झाले व त्याने ते स्वीकार केले व तो स्वत:ही दीक्षा घेण्यासाठी तयार झाला.

**भृगु पुरोहिताचा पत्नीला प्रतिबोध**

आता पत्नी भद्रा पतीला समजावण्यासाठी पुढे सरसावली, ''तुम्ही कशाला संन्यस्त होता ? आता आपण म्हातारे झाले आहोत. आता आपल्याला हा विरुध्द प्रवाह झेपेल का ? म्हातारे हंस, म्हातारे घोडे यांना जसा अर्ध्या वाटेवर पश्चाताप होतो तसा तुम्हालाही होईल. ''सत्य दर्शनाने प्रेरित झालेला पुरोहित म्हणाला, ''खूप मासे जाळ्यात अडकतात, फसतात, पण रोहित मासा फक्त जाळ तोडून निघून जाण्यात यशस्वी होतो. तसा भोगाच्या जाळ्यात फसुनही मी ही रोहीत माश्यासारखा हे भोगाचे जाळे तोडून जाण्यास समर्थ बनेन.'' पुरोहित पत्नीला समजावतो, ''जेव्हा मुले राहिली नाहीत, जेव्हा फांदी राहिली नाही तर वृक्षाचा काय उपयोग ? फांद्याविना असलेल्या वृक्षाला निष्पर्ण म्हटले जाते. मुलाविना असलेल्या बापालाही निष्पर्ण म्हटले जाईल. फांद्याविना वृक्षाची काय शोभा? मुलाविना बापाची काय शोभा ? मीही मुलांबरोबर संयम - मार्गावर जात आहे, तू ही चल...''

भद्रा सुध्दा दीक्षा / संन्यास घेण्यास तयार झाली. पूर्वजन्मीचे चारहीजण संयम साधनेच्या मार्गावर एकत्र आले. आता उरले दोन गवळीपूत्र पाहूया त्यांची जीवनयात्रा.

**इशुका राजाला कमलावती राणीकडून सत्याचा बोध**

त्या काळाचा एक नियम होता, ज्या संपत्तीला कोणी वारसदार नसे ती संपत्ती राजकोषात जाते. भृगुपुरोहीत पत्नी व मुलांसहीत संन्यास घेण्याची बातमी मिळाल्यानंतर इषूका राजाने भृगू पुरोहिताचे सर्व धन-संपत्ती राजकोषात जमा करण्याची कर्मचाऱ्यांना, सेवकांना आज्ञा दिली. हे धन राजकोषात येत असताना कमलावती राणी वरुन पहात होती, परंतु नुसतीच पहात नव्हती तर तिच्या अंतरंगात कंपने निर्माण होत होती. पूर्वजन्मीची नाती तिला साद घालत होती. पूर्व जन्मीच्या साथीदारांबरोबर नात्याच्या तारा जूळू लागल्या, सत्याची स्पंदने जाणवू लागली कमलावती राणी राजाला म्हणाली, ''हे नाथ ! धिक्कार आहे तुमचा. काय करीत आहात तुम्ही ? दुसऱ्याचे थुंकलेले तुम्ही चाटत आहात.''

बंधूंनो, राजाला असे उद्‌गार ऐकवण्याची कशी हिंमत झाली असेल त्या राणीची ! पण त्या वचनांना पूर्वजन्मीच्या स्पंदनाची जोड मिळाली व काय किमया! त्या एका वाक्यात राजा भानावर आला व सत्याचे परीक्षण करु लागला. राणी परत गरजली ''राजन् ! हे नश्वर साम्राज्य आपल्याला सोडायचे आहे.''

बंधूंनो, आपणही आपल्या भोवताली पाहतो. एखाद्या कुत्र्याच्या तोंडात जर हाड असेल तर इतर सर्व कुत्रे त्याचे शत्रु होऊन भूंकत असतात. परंतु विचार करा ते कोणाचे शत्रू असतात ? हाडाचे की कुत्र्याचे ? आणि हाडच सोडून दिले तर.... ? वैर संपेल की टिकेल ? आपणही असेच हाड पकडून ठेवले आहे, हाड सोडून द्या, वैर संपेल.

अधिकार सोडा, शत्रुत्व संपून जाईल. अधिकार सोडा, नाती जुळून येतील.

इषूकार राजाला सत्य जाणवले व तो सावरला इषूकार राजा व कमलावती राणी अशा भगवंताच्या चरणी समर्पित होतात. सहाहीजण साधनेच्या मार्गावर मार्गस्थ होतात.

श्रोत्यांना, या अध्यायाचे पारायण अशा तन्मयतने, भक्तीभावाने करा की आपले सारे जीवलग, सारी नाती आपली माती होण्याआधी आतील ज्योती प्रकट करण्यास सहाय्यभूत होतील. संसाराच्या स्वार्थाच्या मार्गावरील नात्यांना परमार्थाच्या मार्गावर नेऊन सिध्दीच्या शिखरावर पोहचवू या. *(क्रमश:)* ●


महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन
समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वांत खात्रीशीर,
सर्वांत सोपा व सर्वांत स्वस्त मार्ग...
जैन जागृति

**।। पर्युषण पर्व - क्षमा पर्व ।।**
**जैन जागृति**
**पर्युषण अंक**
**२० ऑगस्ट पर्यंत जाहिरात द्या.**

# असा आहे ग्राहकहितदक्ष 'रेरा'

**लेखक : शांतीलाल कटारिया : अध्यक्ष क्रेडाई महाराष्ट्र व**
**अध्यक्ष, अॅफोरडेबल हाउसिंग कमिटी-क्रेडाई नॅशनल, (आदित्य बिल्डर्स, पुणे.)**



**नवा कायदा**

*सर्वसामान्य घर खरेदीदाराचं हक्काच्या घराचं स्वप्न पूर्ण करणाऱ्या बांधकाम व्यवसायाला प्रोत्साहन मिळावं. ग्राहकहितासाठी तसेच घरखरेदीदाराला सुरक्षितता लाभावी, घरखरेदीत आणखी पारदर्शकता यावी या उद्देशानं केंद्र सरकारने 'रिअल इस्टेट रेग्युलेशन डेव्हलपमेंट अॅक्ट २०१६' (रेरा) आणला. या कायद्यासंबंधाने पुरेशा माहितीअभावी अनेक मतमतांतरे असलेली दिसून येतात. त्या पार्श्वभूमीवर 'रेरा'तील बारकाव्यासंबंधाने थोडक्यात माहिती...*

भारतीय परंपरेत आपले स्वत:चे हक्काचे घर झाले, की व्यक्ती आयुष्यात स्थिरस्थावर झाली, बहुतांश यश संपादन केले, अशी आपली मानसिकता आहे. आयुष्यभर मेहनत करून जमा केलेली पुंजी देऊन आपण हक्काचे घर घेतो. हे घेताना ग्राहकाला सुरक्षिततेसाठी कायद्याचे पाठबळ मिळावे, या उद्देशाने केंद्र शासनाने आणलेला हा कायदा निश्चितपणे अभिनंदनीय आहे. ग्राहक हक्काला बळ देणारा कायदा म्हणूनही 'रेरा' कडे पाहिले जाते.

गृहबांधणी क्षेत्राविषयी अस्तित्वात असलेले भारतातील कायदे व महाराष्ट्र अस्तित्वात असलेले कायदे तसेच सर्वोच्च व उच्च न्यायालयाने स्थावर मालमत्ता प्रकरणांमध्ये दिलेले अनेक वर्षातील निकाल, सर्वसामान्यांचा देखील रिअल इस्टेट क्षेत्राकडे असलेला गुंतवणुकीचा ओढा याचा सविस्तर विचार विनियम करून ग्राहकहिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्याच वेळी गृहबांधणी क्षेत्रालाही वेग यावा, त्याला प्राधान्य मिळावे व सर्वात महत्वाचे म्हणजे व्यवहारामध्ये पारदर्शकता यावी, देशी व परदेशी गुंतवणूक वाढावी या सर्व उद्दिष्टांच्या दृष्टिने केंद्र शासनाने हा कायदा केला आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार, प्रत्येक राज्याने कायद्याच्या अनुषंगाने नियमावली बनविण्याचे व 'रेग्युलेटरी अॅथॉरिटी' व इतर यंत्रणा उभी करण्याची मुदत ही एप्रिल २०१७ अशी देण्यात आलेली होती. ग्राहकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारा हा कायदा प्रत्यक्षात १ मे २०१७ ला संपूर्ण महाराष्ट्रात अंमलात आला. महाराष्ट्र सरकारने नियमावली व वेबसाईट प्रकाशित करून ऑनलाईन नोंदणी चालू केल्याने सर्वार्थाने या कायद्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. उर्वरित राज्यांमध्ये या कायद्याच्या नियमावली अंमलबजावणीसाठी आणखी नियोजन पातळीवर असल्याचे सध्यातरी दिसते आहे. मात्र संपूर्ण देशात हा कायदा १ मे २०१७ रोजी लागू झाला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीने रिअल इस्टेट क्षेत्रात नवीन युगाला प्रारंभ होईल. 'रेरा' कायद्याचा सर्वसाधारण अवलोकन करता खालील गोष्टी ठळकपणे समाविष्ट करण्यात आले असल्याचे दिसून येते....

१) आठपेक्षा अधिक फ्लॅट व ५०० चौ. मीटर पेक्षा अधिक बांधकाम व विक्रीसाठी आता राज्य सरकारची परवानगी घेणे आवश्यक असणार आहे.

२) रिअल इस्टेट एजंटनादेखील व्यवसायासाठी परवानगी घेणे अनिवार्य असणार आहे.

३) राज्य सरकारच्या 'रेग्युलेटरी अॅथॉरिटीची परवानगी घेतल्याशिवाय कोणतीही गृहप्रकल्पाच्या विक्रीची

जाहिरात अथवा विक्री करता येणार नाही.

४) व्यावसायिक प्रकल्पांमध्ये प्रत्येक गाळ्याचे चटई क्षेत्र (कार्पेट एरिया) करारनाम्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. या कायद्यात चटई क्षेत्राची देखील व्याख्या स्पष्ट करण्यात आलेली आहे.

५) बांधकाम सुरू असलेल्या प्रकल्पाला (कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी भोगवटापत्र मिळाले नसेल तर) देखील विक्रीसाठी परवानगी घेणे आवश्यक असणार आहे म्हणजेच हा कायदा त्यांनाही लागू होणार आहे.

६) विकासकास स्वत:विषयी, स्वत:च्या आर्थिक नियोजनाची व प्रकल्पाविषयाची संपूर्ण माहिती सुरूवातीस देणे आवश्यक आहे. महत्वाचे म्हणजे प्रकल्पाच्या किमतीचा अंदाज म्हणजे जागेची किंमत, बांधकामाचा खर्च व इतर खर्च याविषयी माहिती संकेतस्थळावर देणे आवश्यक आहे.

७) प्रकल्प कधी पूर्ण होणार, ताबा कधी दिला जाणार ती तारीख, खरेदीखत कधी करणार ती तारीख, प्रकल्पाच्या सोई-सुविधा प्रकल्पाचे आर्किटेक्ट, कंत्राटदार, बॅकरर्स तसेच विविध परवानग्या व नकाशे (इमारती व लेआऊट) संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक राहणार आहे.

८) प्रकल्पाच्या नोंदणीसाठी प्राधिकरणाकडे सर्व कागदपत्रे ऑनलाईन दाखल करावी लागणार आहेत. तसेच त्या प्रकल्पास प्राधिकरणाने ३० दिवसांत परवानगी द्यायची आहे, परवानगी नाकारण्याचा देखील अधिकार 'ॲथॉरिटी'कडे असणार आहे.

९) बांधकाम सुरू असलेल्या प्रकाल्पामध्ये व विक्रीमध्ये विकसकाने नियमांचा भंग केल्यास, चुकीची माहिती दिल्यास, बांधकामाला विलंब केल्यास त्या प्रकल्पाचे प्राधिकरणाकडील नोंदणी रद्द करून 'ॲथॉरिटी' ही स्वत: इतर विकसकाकडून उर्वरीत काम पूर्ण करून घेऊ शकेल.

१०) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ५ वर्षापर्यंत बांधकामात झालेले दोष निवारणाची जबाबदारी विकसकावर असणार आहे.

११) वेळेवर ताबा ठरलेल्या वेळी खरेदीखत करून देणे या महत्वाच्या जबाबदाऱ्या विकसकावर राहणार आहेत.

१२) विकसकाच्या चुकीमुळे विलंब झाल्यास विकसकाला ग्राहकाने वेळेवर पेमेंट न केल्यास ग्राहकाला व्याज भरावे लागणार आहे.

१३) मंजूर झालेल्या/ग्राहकांना दर्शविलेल्या बांधकामाच्या नकाशात बदल करावयाचा झाल्यास दोन तृतांश ग्राहकांची लिखित परवानगी आवश्यक असणार आहे.

१४) ग्राहकांकडून जमा केलेल्या रक्कमपैकी ७० टक्के रक्कम स्वतंत्र खात्यामध्ये ठेवून त्यातून बांधकामाचा खर्च करावयाचा आहे. सदरची ७० टक्के रक्कम बँकेत ठेवणे हे सर्व विकसकांना बंधनकारक राहणार आहे.

१५) विकासकाला जमीन व बांधकामाचा विमा उतरवणे बंधनकारक राहणार आहे.

१६) व्यावसायिक प्रकल्पातील सर्व गाळेधारकांची सोसायटी अथवा असोशिएशनने दिलेल्या वेळेत करणे बंधनकारक राहणार आहे.

१७) वेळेवर पेमेंट करणे व वेळेवर ताबा घेणे ही जबाबदारी ग्राहकांचीदेखील असणार आहे.

१८) विकसक अथवा ग्राहक विरूद्धची तक्रार 'रेग्युलेटरी ॲथॉरिटी'कडे करता येणार आहे. त्यावरील 'अपील ट्रिब्युनल'कडे करता येणार आहे.

१९) या कायद्यामध्ये गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दंडाची तरतुद करण्यात आलेली आहे.

२०) 'ॲथॉरिटी' व 'ट्रिब्युनल यांना ठराविक वेळेत निर्णय देण्याचे घालण्यात आलेले आहे. या आणि अशा कायद्याच्या महाराष्ट्र शासनाला असलेला

प्रदीर्घ अनुभव व ग्राहकांचे हित लक्षात घेता, पारदर्शक, सुस्पष्ट, व्यवहारी, नियमावली आणण्यात आलेली आहे. 'रेरा' कायद्यामुळे २०१६ व २०१७ हे वर्ष हे विकसक व ग्राहकांच्या स्मरणात राहील.

**महत्वाचे**

१) रेरा कायदा ग्राहकहिताचा.

२) नागरी जमीन धारणा (ULC) १९७६ नंतरचा बांधकाम क्षेत्रावर दुरगामी परिणाम करणारा 'रेरा' हा ऐतिहासिक कायदा.

३) प्रमोटरची बांधकाम किंमत वाढण्याची शक्यता, पर्यायाने सदनिकेची विक्रीची किंमत वाढण्याची शक्यता..

४) व्यवहारात प्रारदर्शकता येणार असल्याने व पैशाच्या विनियोगावर नियंत्रण राहणार असल्याने सदनिकाधारकांना वेळेवर ताबा मिळण्याची शक्यता.

५) रेरामुळे विश्वासार्ह बिल्डरांना फायदा.

६) अनधिकृत व्यवसायिकांना चाप.

७) सदनिका विक्रीत वाढ होण्याची शक्यता.

८) २०१७-२०१८ मध्ये रेरा, केंद्राचे अनुकूल धोरण व वाजवी व्याजाचेदर यामुळे फ्लॅट विक्रीत २५% वाढीचे अनुमान.

**प्रमोटर**

१) रेरा कायदा १ मे २०१७ पासुन सर्व प्रकल्पांना लागू झाला.

२) चालू प्रकल्पांना नोंदणीसाठी अर्ज करावयाची मुदत ३१ जुलै २०१७

३) नवीन प्रकल्प नोंदणी शिवाय विक्रीसाठी जाहिरात करता येणार नाही.

४) आता सदनिका चटई क्षेत्र करारात व्याख्या रेरा प्रमाणे

५) सदनिका ताब्याची तारीख करारात नमुद करावी लागणार

६) खरेदीखत करून द्यावयाची तारीख करारात नमुद करावी लागणार

७) सदनिका धारकांचे ७०% पैसे शेड्युल बँकेत स्वतंत्र ठेवावे लागणार

८) लिखित करारापुर्वी १० % रक्कम घेता येणार.

९) प्रमोटर व ग्राहकांना एकमेकांना द्यावयाचा व्याजाचा दर आता सारखाच राहणार.

१०) प्रमोटरना प्रकल्पाच्या बांधकामाचा विमा उतरावा लागणार.

११) प्रमोटर डिफेक्ट लायेबिलीटी कालावधी (Defect Liability Period) ५ वर्षाचा राहणार (जनरल मेनटेनन्स चा नव्हे)

१२) प्रकल्पाच्या बांधकामाच्या सर्व परवानग्या मिळाल्यानंतरच नवीन प्रकल्प ऑनलाईन नोंदविता येणार.

१३) प्रमोटरने प्रकल्प अर्धवट सोडल्यास सरकारला अथवा सदनिकाधारकांना तो ताब्यात घेऊन पूर्ण करता येणार. म्हणजे प्रकल्प पुर्ण होण्याची शाश्वती.

१४) काही विशिष्ट प्रकल्पात जमीन मालकही को प्रमोटर होणार.

**सदनिकाधारक**

१) प्रकल्पाच्या नकाशांची, बांधकामाच्या नियोजनाची, सुविधांची माहिती घेण्याचा अधिकार.

२) वेळेवर ताबा मागण्याचा अधिकार.

३) वेळेवर ताबा मिळत नसल्यास व्याज मागण्याचा अधिकार तसेच सदनिका रद्द करून भरलेली रक्कम व्याजासह मागण्याचा अधिकार.

४) करारात नमुद केले प्रमाणे प्रमोटरना वेळेवर हप्ते भरण्याची जबाबदारी. हप्ते वेळेवर न भरल्यास व्याज द्यावे लागणार. लागोपाठ ३ हप्ते न भरल्यास प्रमोटरला सदनिका रद्द करण्याचा अधिकार.

५) पूर्णत्वाच्या दाखल्यापासून २ महिन्यात सदनिकेचा ताबा घ्यावा लागणार. ●

## कव्हर तपशील - जुलै २०१७

- **राष्ट्रसंत श्री पुलकसागरजी म.सा.**
  भारत गौरव, राष्ट्रसंत मुनिश्री पुलकसागरजी म.सा. यांचा यावर्षी बारामती येथे चातुर्मास होणार आहे. मुंबई येथून बारामतीला जाताना त्यांचे ३० मे रोजी पुणे शहरात आगमन झाले. यावेळी पुणे येथील ज्योतिष मार्गदर्शक श्री. विनोदजी धर्मचंदजी जैन (योगी) यांच्या सोमवार पेठ येथील दुकानी व निवास येथे गुरुदेवांनी पगल्या केल्या व आहार ग्रहण केला.
- **श्री प्रीतिसुधाजी म.सा. – अमृत महोत्सव, पुणे**
  वाणीभूषण श्री प्रीतिसुधाजी म.सा. आदी ठाणा १२ यांचा यावर्षी बिबवेवाडी स्थानकात चातुर्मास आहे. श्री प्रीतिसुधाजी म.सा. यांचे ७५ व्या वर्षात पदार्पण होत आहे. या निमित्त २४ जुलै ते १ ऑगस्ट २०१७ या दरम्यान अमृत महोत्सव साजरा केला जाणार आहे. शिखर कार्यक्रम १ ऑगस्ट रोजी बिबवेवाडी जैन स्थानक, यश लॉन्स येथे साजरे केले जाणार आहे.
- **श्री. सुनील सिंघी – निवड**
  राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगावर श्री. सुनीलजी सिंघी यांची सदस्य म्हणून भारत सरकार तर्फे निवड केली आहे. सकल जैन समाजातर्फे दिल्ली येथे अभिनंदन समारंभाचे आयोजन झाले. यावेळी गणि श्री राजेंद्रविजय, राज्यसभा सदस्य श्री. मेघराज जैन, श्री. रतन जैन, श्री. राजकुमार जैन, श्री. ललित नाहाटा, श्री. किशोर कोचर इ. मान्यवर उपस्थित होते.
- **दि पूना मर्चन्ट चेंबर – GST निवेदन**
  दि पूना मर्चंन्ट चेंबरतर्फे GST संदर्भात ९ जून रोजी राज्यव्यापी परिषदेचे आयोजन झाले. तसेच १५ जून रोजी एक दिवस बाजार बंद ठेवण्यात आला. दि. पूना मर्चन्ट चेंबरतर्फे अध्यक्ष श्री. प्रवीणजी चोरबेले, उपाध्यक्ष श्री. जवाहरलालजी बोथरा, सचिव श्री. अशोक लोढा, श्री. वालचंदजी संचेती, श्री. राजेंद्र बांठिया यांनी जिल्हाधिकारी पुणे यांना GST संदर्भात निवेदन सादर केले.
- **वीरचंद हजारीमल घीवाला – उद्घाटन**
  गणेश पेठ पुणे येथील प्रसिद्ध पेढी ''वीरचंद हजारीमल घीवाला'' यांची दूसरी फर्म मांडोत टॉवर, शांतीनगर सोसायटी समोर, कोंढवा ब्रु पुणे येथे ११ जून २०१७ रोजी सुरू केली आहे. या उद्घाटन प्रसंगी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून श्री. भवरलालजी राठोड, सौ. कंचन राठोड, सुभाष भूरट, सौ. नंदा भूरट, निता भूरट, आशिष भूरट यांना शुभेच्छा दिल्या.
- **गांधी हॉस्पिटल, औरंगाबाद – उद्घाटन**
  औरंगाबाद येथील गांधी मुलांचे हॉस्पिटल रुग्णांना गेल्या २५ वर्षापासून सेवा देत आहे. रौप्य महोत्सव वर्षाच्या पदार्पणा निमित्त हॉस्पिटलच्या विस्तारीत सेवेचे विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते ११ जून रोजी उद्घाटन करण्यात आले. यावेळी सोबत डॉ. राजेंद्र गांधी, डॉ. अक्षय गांधी, डॉ. प्राची गांधी, डॉ. आशिष गांधी, डॉ. रोहित मुनोत व अनेक मान्यवर उपस्थित होते.
- **सुनिता देसर्डा – पुरस्कार**
  चिंचवड पुणे येथील सुनिता राजेंद्रजी देसर्डा (चॉईस टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स्) यांना स्वानंद महिला संस्था व कॉन्फरन्स महिला शाखेतर्फे माता त्रिशला व माई पुरस्कार देण्यात आला. पंचम झोनच्या अध्यक्षा सौ. सुरेखाजी कटारिया, उपमहापौर शैलजा मोटे, सौ. पगारिया यांच्या हस्ते सुनिता देसर्डा यांना पुरस्कार देण्यात आला.
- **श्री. किशोर पिरगळ – पुरस्कार**
  व्यापारी एकता दिना निमित्त दिला जाणारा या

वर्षीचा फिनिक्स पुरस्कार पुणे येथील आनंद एजन्सीज्चे संचालक श्री. किशोरजी पिरगळ व सौ. स्वातीजी पिरगळ यांना डॉ. आनंदजी देशपांडे आणि डॉ. संजयजी मालपाणी यांच्या हस्ते देण्यात आला.

- **क्लासिक पब्लिसिटी – अहमदनगर**

  १५ जून रोजी पुणे येथे टॅग संस्थेतर्फे आयोजित विशेष समारंभात क्लासिकला सर्वोत्कृष्ट डिझायनिंगचा टॅग पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्लासिकचे मार्केटींग हेड शुभम आणि प्रॉडक्शन हेड भाग्यश्री कऱ्हाडा यांना प्रसिद्ध लेखक व प्राध्यापक मिलींद जोशी व अरुणाताई भट्ट यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

- **श्री. ओमप्रकाशजी रांका, पुणे**

  सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर पुणे येथील प्रसिध्द सराफ श्री. ओमप्रकाशजी रांका यांचा १६ जुलै रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्त त्यांची विशेष मुलाखत जैन जागृतित प्रसिध्द केली आहे.

- **सिलाई वर्ल्ड – पुरस्कार**

  व्हिएतनाम येथे इंडियन टेरान यांच्या रिटेल कॉन्फरन्स मध्ये पुणे येथील सिलाई वर्ल्ड ला बेस्ट रिटेल आऊटलेट अ‍ॅवॉर्ड देण्यात आला. सिलाई वर्ल्डचे श्री. दादासाहेब गुजर यांनी अ‍ॅवॉर्ड स्विकारला.

- **श्री. सागर चोरडिया – M.S.**

  जैन जागृतिचे संपादक श्री. संजय कांतीलालजी चोरडिया व सौ. सुनंदा संजय चोरडिया यांचे सुपुत्र श्री. सागर याला अमेरिकेतील Stanford University येथून Computer Science with specialization in Artificial Intelligence या विषयात M.S. डिग्री मिळाली आहे. ●